## प्रसिध्दी पत्रक

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण)ला दि. १ एप्रिल, २०२३ पासून लागू होणारा वीज दर

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण) ही मुंबईतील काही क्षेत्रांसह, महाराष्ट्र राज्यात विजेचे वितरण करणारी एक परवानाधारक आहे. महावितरणची आर्थिक वर्ष २०१९-२०२०, २०२०-२१ आणि २०२१-२२ करिता अचूक समायोजन (true-up), २०२२-२३ करिता तात्पुरते अचूक समायोजन (provisional truing-up), तसेच २०२३-२४ आणि २०२४-२५ या नियंत्रण कालावधीकरिता अंदाजित एकूण महसुली गरज (ARR) आणि वीज दरास मंजुरीसाठीची वीज दर याचिका दि. २४ जानेवारी, २०२३ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दाखल करुन घेतली.

आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार, महावितरण कंपनीने या याचिकेवर जनतेकडून लेखी सूचना आणि हरकती मागविल्या आणि दि. २१ फेब्रुवारी, २०२३ ते ०३ मार्च, २०२३ दरम्यान पुणे, नवी मुंबई, अमरावती, नागपूर, औरंगाबाद आणि नाशिक जाहीर सुनावण्या घेतल्या. जनतेशी सल्लामसलतीच्या या प्रक्रियेनंतर आयोगाने, दि. ३१ मार्च, २०२३ रोजीच्या आदेशाद्वारे आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि २०२४-२५ साठी महावितरण कंपनीची एकूण महसुली गरज आणि वीज दर निश्चित केला आहे. सुधारित वीज दर दिनांक १ एप्रिल, २०२३ पासून अंमलात येतील.

आयोगाने ग्राहक हित आणि परवानाधारकाचे वैध खर्च या दोहोंमध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे.

आयोगाच्या या आदेशातील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेतः

### ए. एकूण महुसली तुटीस मंजुरी :

१. आयोगाने, ४ थ्या नियंत्रण कालावधीच्या उर्वरित कालावधीदरम्यान म्हणजेच आर्थिक वर्ष २०२३-२४ ते २०२४-२५ या कालावधीत वसूल करावयाची महसुली तूट खालील तक्त्यात दाखविल्याप्रमाणे निश्चित केली आहे :

| तपशील | महावितरण कंपनीची याचिका | या आदेशात दिलेली मंजुरी |
|---|---|---|
| आर्थिक वर्ष २०१९-२० करिता अंतिम अचूक समायोजनाची आवश्यकता | ११,५१५ | ९,३०९ |
| आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता अंतिम अचूक समायोजनाची आवश्यकता | ५,९३२ | १,६०२ |

| तपशील | महावितरण कंपनीची याचिका | या आदेशात दिलेली मंजुरी |
|---|---|---|
| आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता अंतिम अचूक समायोजनाची आवश्यकता | ८,१५१ | ४,१४६ |
| आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता तात्पुरते अचूक समयोजन गरज/ महसुली तूट | ५४८ | -६,२४१ |
| आर्थिक वर्ष २०२३-२४ करिता महसुली तूट | १३,९३९ | ११,६४४ |
| आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता महसुली तूट | १८,५७६ | १२,९९८ |
| आढावा आदेशाचा परिणाम (बहु-वर्षीय वीज दर आदेश) | २४७ | २४७ |
| महानिर्मिती कंपनीच्या आर्थिक वर्ष २०१९-२० ते २०२२-२३ पर्यंतच्या अचूक समायोजनाचा परिणाम | - | १,०९० |
| मागील तूट/परिणामासाठी येणे असलेले व्याज (कॅरिंग कॉस्ट) आणि नियंत्रण कालावधीदरम्यान वसुल न केलेली तूट | ८,७३४ | ४,७७२ |
| **४ थ्या नियंत्रण कालावधीच्या उर्वरित कालावधी दरम्यान म्हणजेच आर्थिक वर्ष २०२३-२४ ते २०२४-२५ या कालावधीत वसूल करावयाची एकूण महसुली तूट** | **६७,६४३** | **३९,५६७** |
| **वीज दरापासून नक्त वसुली** | **६७,६४३** | **३९,५६७** |

२. अशा रीतीने, महावितरण कंपनीने अंदाजित केलेल्या रु. ६७,६४३ कोटींच्या एकूण महसुली तुटीच्या ऐवजी, आयोगाने रु. ३९,५६७ कोटी इतकी एकूण महसुली तूट निश्चित केली आहे, जी ४ थ्या नियंत्रण कालावधीच्या उर्वरित कालावधीत, म्हणजेच आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि २०२४-२५ दरम्यान वसूल करण्याची आवश्यकता आहे.

३. या महसुली तुटीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत – (ए) आयात केलेल्या इंधनाच्या खर्चात झालेल्या चढउतारामुळे इंधन खर्चात झालेली वाढ आणि औष्णिक निर्मिती केंद्रांसाठी आयात कोळसा आणि देशांतर्गत कोळशाच्या मिश्रणासंबंधातील सूचना, (बी) वेगवेगळ्या प्राधिकरणाच्या निकालांच्या अनुषंगाने स्वतंत्र वीज निर्मात्यांनी कायद्यातील बदल आणि कर व शुल्कापोटी प्राप्त करावयाच्या केलेल्या दाव्याचा परिणाम, (सी) प्रकल्प कार्यान्वित होण्यामध्ये झालेल्या विलंबामुळे नूतनशील ऊर्जेच्या उपलब्धतेमधील तूट, (डी) कोविड -१९ च्या परिणामुळे महसुलात झालेली तूट, (इ) वितरण हानिमध्ये लक्ष्यांकित केलेली कपात पूर्ण होण्यामधील तूट, (एफ) पारेषण यंत्रणा

खर्च आणि पारेषण आकारामध्ये झालेली वाढ, (जी) महानिर्मिती कंपनीच्या निर्मिती केंद्राच्या खर्चाच्या अचूक समायोजनाचा परिणाम, (एच) कॅरिंग कॉस्टचा परिणाम.

४. वीज पुरवठ्याच्या एकूण सरासरी खर्चामध्ये झालेल्या लक्षणीय वाढीमुळे, वेगवेगळ्या वर्गवारीसाठीच्या वीज दरामधील वाढ अटळ आहे. तथापि, महावितरण कंपनीने आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी दावा केलेल्या अनुक्रमे १४ टक्के आणि ११ टक्के वीज दरवाढीऐवजी आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी फक्त २.९ टक्के आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी ५.६ टक्के वाढ केली आहे.

५. उच्च-दाब औद्योगिक वर्गवारीसाठी विजेच्या एकूण सरासरी किंमतीमध्ये सुमारे १ टक्के किमान वाढ होईल तर लघु-दाब औद्योगिक वर्गवारीसाठी विजेची सरासरी किंमत आणि सरासरी देयक आकारणी (एबीआर) मध्ये आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी प्रत्यक्षात सुमारे १ टक्के कपात होईल.

६. वाणिज्यिक वर्गवारीच्या (उच्च-दाब आणि लघु-दाब) बाबतीत, आर्थिक वर्ष २०२३-२४ दरम्यान या वर्गवारींसाठी विजेच्या सरासरी किंमतीत आणि सरासरी देयक आकारणीमध्ये (एबीआर) सुमारे १ टक्के कपात होईल.

७. आयोगाने अतिरिक्त वीज वापरास चालना देण्यासाठी, लघु-दाब औद्योगिक आणि लघु-दाब वाणिज्यिक वर्गवारीसह, विनिर्दिष्टीत लघु-दाब वर्गवारीसाठी प्रति केडब्ल्युएच रु. ०.७५ ची आनुषंगिक वीज वापरावर सवलत देण्याची संकल्पना मांडली आहे, ज्यामुळे लघु-दाब औद्योगिक आणि लघु-दाब वाणिज्यिक वर्गवारीमधील ग्राहकांसाठी विजेच्या एकूण खर्चात घट होईल. अशी आनुषंगिक वीज वापराची सवलत लघु-दाब सार्वजनिक सेवा ग्राहकांसाठी देखील उपलब्ध राहील.

८. **यंत्रमाग ग्राहकांसाठी कमी वीज दराचा लाभ :** यंत्रमाग ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, आयोगाने यंत्रमागाच्या (<२० केडब्ल्यु आणि > २० केडब्ल्यु) या दोन्ही टप्प्यांसाठी (लागू असल्यास, एफएसीसह), लघु-दाब औद्योगिक वर्गवारी अंतर्गत येणाऱ्या संबंधित टप्प्यांसाठी लागू असलेल्या वीज दराच्या ऊर्जा आकारांच्या घटकाच्या तुलनेत, वीज दराच्या ऊर्जा आकाराच्या घटकांमध्ये (२.५ टक्के) कमी वीज दर (सूट/सवलत) चालू ठेवला आहे. त्याशिवाय, यंत्रमाग ग्राहकांना विनिर्दिष्टीत लघु-दाब वर्गवारीसाठी सुरु करण्यात आलेल्या प्रति केडब्ल्युएच रु. ०.७५ च्या आनुषंगिक वीज वापर सवलतीचा देखील लाभ घेता येईल.

९. **उच्च-दाब औद्योगिक ग्राहकांसाठी ठोक वीज पुरवठा सवलत आणि मुक्त प्रवेशासाठी क्रॉस-सबसिडी अधिभारामध्ये कपात** : आयोगाने उच्च-दाब वर्गवारींसाठी बहु-वर्षीय वीज दर आदेशांतर्गत सुरु करण्यात आलेली आनुषंगिक वीज वापर सवलत आणि ठोक वीज वापर सवलत कायम ठेवली आहे. अशी सवलत, विनिर्दिष्ट केलेल्या अटींच्या अधीन राहून, अंशतः मुक्त प्रवेश ग्राहक आणि यंत्रणेमध्ये जोडलेल्या नवीन ग्राहकांसाठी देखील उपलब्ध राहील. त्याशिवाय, वीज मंत्रालयाने दि. २९ डिसेंबर, २०२२ रोजी अधिसूचित केलेल्या विद्युत (सुधारणा) नियम, २०२२ च्या धर्तीवर, क्रॉस-सबसिडी अधिभार वीज पुरवठ्याच्या सरासरी खर्चाच्या २० टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवण्यात आला आहे. अशा उपाययोजनांमुळे मुक्त प्रवेशाची निवड करु इच्छिणाऱ्या ग्राहकांना किंवा ज्यांनी आधीच मुक्त प्रवेशाची निवड केली आहे त्यांना टिकवून ठेवण्यास मदत होईल.

१०. लोड फॅक्टर प्रोत्साहन-अधिदान, त्वरित भरणा सूट आणि टाईम ऑफ डे पध्दतीमध्ये रात्रीच्या वीज वापरातील सवलतीसह अन्य सर्व प्रोत्साहन-अधिदाने कायम ठेवण्यात आली आहेत.

११. **उच्च-दाब औद्योगिकच्या सिंगल शिफ्ट ऑपरेशनसाठी मागणी आकारामध्ये सवलतः** उच्च-दाब औद्योगिक अंतर्गत औद्योगिक ग्राहकांच्या बाबतीत, सिंगल शिफ्ट ऑपरेशनसह, बहु-वर्षीय वीज दर आदेशा अंतर्गत सुरु केल्याप्रमाणे, वीज दर शेड्युलनुसार लागू असलेल्या मागणी आकारांच्या ६० टक्के दराने मागणी आकार लावण्यात येतील.

**१२. घरगुती वीज वापर वर्गवारीसाठी वीज दराचे सुसुत्रीकरणः**

आयोगाने घरगुती/ निवासी ग्राहकांसाठीच्या ऊर्जा आकारांमध्ये वाढ केली आहे परंतु ऊर्जा आकारामधील ही वाढ विशेषतः दरमहा १०० युनिट्स पेक्षा कमी वीज वापर असणाऱ्या ग्राहकांसाठी कमीत कमी राहील तसेच सर्व ग्राहकांसाठी स्थिर आकारांमध्ये किरकोळ वाढ राहील याची काळजी घेतली आहे. त्याशिवाय, आयोगाने टेलिस्कोपिक स्लॅबचे लाभ कायम ठेवले असून त्याचा लाभ घरगुती ग्राहकांना होणार आहे.

**१३.** याव्यतिरिक्त, आयोगाने असे मत मांडले आहे की, घरगुती वीज वापराच्या वर्गवारीसाठीच्या वीज दर संरचनेचा आढावा/फेर-पाहणी करण्याची तातडीची गरज आहे, ज्यात जास्त वीज वापर असणाऱ्या ग्राहकांच्या टप्प्यासाठी टेलिस्कोपिक लाभ चालू ठेवण्याची आवश्यकता आहे. त्यानुसार, आयोगाने, महावितरण कंपनीला विविध पर्यायांचा अभ्यास आणि परिणामांचे मूल्यांकन

करण्याचे आणि पुढील वीज दरातील सुधारणेदरम्यान टेलिस्कोपिक वीज दर रचनेच्या आढाव्यासह घरगुती वीज वापराच्या वर्गवारीसाठी वीज दर संरचना/डिझाईनचा आढावा घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

१४. **आगाऊ भरणा केलेल्या देयकाच्या रकमेवर सवलतः** जाहीर सुनावणी दरम्यान अनेक ग्राहक/हरकतदार/संबंधितांनी आगाऊ भरणा केलेल्या देयकाच्या रकमेवर सूट/सवलत मिळण्याची गरज व्यक्त केली होती. आयोगाने ग्राहकांना मागील बारा महिन्यांतील सरासरी मासिक देयकाच्या १२ पटीपेक्षा जास्त नसलेल्या रकमेसाठी देयकांचा आगाऊ भरणा/ पूर्व-भरणा करण्याची परवानगी दिली आहे. अशी सवलत केवळ थकबाकीदार नसलेल्या ग्राहकांसाठी त्यांच्या मागील १२ महिन्यांच्या भरणा रकमांच्या नोंदीनुसार उपलब्ध राहील. असे ग्राहक, मध्यावधी आढावा आदेशांतर्गत निर्धारित केलेल्या यंत्रणेनुसार, जोपर्यंत त्यांनी वीज कंपनीकडे आगाऊ भरणा रक्कम कायम ठेवली असेल तोपर्यंत त्यांच्या मासिक देयकांवर श्रेणीबध्द पध्दतीने सवलत घेण्यास पात्र असतील. शिवाय, पूर्व-भरणा (प्रीपेड) मीटर जोडणी असलेल्या ग्राहकांना मिळणाऱ्या सवलतीत सुधारणा करण्यात आली असून, त्यामध्ये ग्राहक वर्गवारीसाठी लागू असलेल्या ऊर्जा आकारांच्या दराच्या २ टक्क्यांपर्यंत (एफएसीसह) सुधारणा केली आहे.

१५. स्थिर/मागणी आकारांच्या माध्यमातून स्थिर खर्चाच्या वसुलीच्या कल्पनेचा स्वीकार करताना, आयोग स्थिर/मागणी आकारांमध्ये हळूहळू वाढ करीत आहे. तथापि, स्थिर/मागणी आकारांपासून वसुली एकूण महसुलाच्या १६-१७ टक्के आहे.

१६. **इलेक्ट्रिक वाहनांसाठी वीज दर :** राज्यातील विद्युत वाहनांना (इव्ही) यापुढेही प्रोत्साहन चालू ठेवण्यासाठी, आयोगाने, विद्युत वाहने (इव्ही) वर्गवारीसाठी कमी स्थिर/मागणी आकार मंजूर केले आहेत आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ करिता ईव्ही चार्जिंग स्टेशनचे दर वीज पुरवठ्याच्या सरासरी दराच्या (ACoS) जवळपास असण्याची खात्री केली आहे, ज्यामध्ये लघु-दाब व्होल्टेज पातळीवर प्रभावी अस्थिर आकार प्रति युनिट रु. ७.२५ आणि मागणी आकार दरमहा रु. ७५ प्रति केव्हीए असतील. त्याशिवाय, ही चार्जिंग स्टेशन्स, टाईम-ऑफ-डे वीज दरांव्यतिरिक्त, लागू असल्याप्रमाणे लोड फॅक्टर आणि पॉवर फॅक्टर प्रोत्साहन/दंडास देखील पात्र राहतील, ज्यामुळे त्यांचा वीज दर

आणखी कमी होईल. त्याशिवाय, ग्राहक त्यांची इलेक्ट्रिकल वाहने चार्जिंग करण्यासाठी या वर्गवारीअंतर्गत स्वतंत्र जोडणी घेऊ शकतील.

१७. आयोगाने क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड, युपीआय, भीम, इंटरनेट बँकींग, मोबाईल बँकींग, मोबाईल वॉलेट इ. द्वारा मासिक विद्युत देयकांचा भरणा करणाया लघु-दाब वर्गवारीमधील ग्राहकांच्या मासिक विद्युत देयकांमध्ये, प्रति महिना रु. ५००/- च्या मर्यादेच्या अधीन राहून, ०.२५ टक्क्यांची सूट (कर आणि शुल्क वगळून) कायम ठेवली आहे.

१८. 'गो ग्रीन' पुढाकाराच्या पुष्ट्यर्थ, ग्राहकांनी प्रत्यक्ष देयकाच्या प्रती ऐवजी ई-देयकचा पर्याय स्वीकारल्यास, कागदाच्या वापरात बचत तसेच देयकाची छपाई आणि देयक वितरणाच्या खर्चात बचत करण्याच्या उद्देशाने, आयोगाने ग्राहकांना देयकामध्ये प्रति महा प्रति देयक रु. १०/- ची सवलत देण्यास मंजुरी दिली आहे.

## बी. <u>वीज दर वर्गवारी अंतर्गत स्पष्टीकरण आणि पुन-वर्गीकरणाद्वारे विशिष्ट ग्राहक वर्ग/वापरास दिलासाः</u>

१९. आयोगाने औद्योगिक वर्गवारी अंतर्गत किरकोळ गॅस फिलिंग स्टेशन्ससह एकाच आवारातील गॅस बॉटलिंग प्लान्ट, पॅकेज केलेले पेयजल प्लान्ट, कायमस्वरुपी स्थित असलेले रेडी-मिक्स आणि हॉट मिक्स प्लान्ट यांचा समावेश केला आहे, जे याआधी वाणिज्यिक वर्गवारी अंतर्गत वर्गीकृत करण्यात आले होते.

२०. आयोगाने सर्व फुलशेती, बागायती (फळशेतीसह), रोपवाटिका आणि वृक्षारोपण उपक्रम लघु-दाब कृषी (मीटर असलेली) वर्गवारीमध्ये समाविष्ट केले, जे याआधी एलटी-कृषी (अन्य) अंतर्गत समाविष्ट होते. यामुळे फलोत्पादन, रोपवाटिका आणि वृक्षारोपण उपक्रमात कार्यरत असलेल्या ग्राहकांना महत्वपूर्ण दिलासा मिळेल, अनेक ग्राहकांनी यासंबंधात जनसुनावणी प्रक्रियेदरम्यान विनंती केली होती.

२१. आयोगाने सार्वजनिक सेवा - अन्य या वर्गवारीमध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियमांतर्गत नोंदणीकृत धार्मिक ट्रस्ट समाविष्ट केले आहेत.

२२. पर्यटनाला चालना देण्यासाठी, 'होम-स्टे' वाणिज्यिक वर्गवारीमध्ये वर्गीकृत केले जाणार नसून, त्याऐवजी त्यास निवासी वर्गवारी म्हणून विचारात घेण्यात येईल.

२३. उच्च-दाब गट गृहनिर्माण वर्गवारी अंतर्गत संरक्षण वसाहती/आस्थापनांसाठी उर्जा आकारांमध्ये (एफएसीसह) २० टक्के कपात करण्यास परवानगी देण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे.

**सी. कृषी जोडण्यांवर मीटर बसविणे आणि वितरण हानिचे मूल्यांकन :**

२४. सन २०१९ च्या प्रकरण क्र. ३२२ अंतर्गत बहु-वर्षीय वीज दर आदेशानुसार, आयोगाने फिडरवर आधारीत कृषी निर्देशांक परिगणनेचा दृष्टीकोन सादर केला होता आणि आयोगाने गठीत केलेल्या कृषी कार्यकारी गटाने अभ्यासासाठी निवडलेल्या ५०२ नमुना फिडर्ससाठी त्याची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली होती, कारण एएमआर/एमआरआय फिडर मीटर डेटा आणि ग्राहक/डीटीसीचे मॅपिंग, कृषी/बिगर-कृषी ग्राहकांची सूची आणि तांत्रिक हानि मूल्यांकनासाठीची चौकट आधीच अस्तित्वात आहे.

२५. राज्यातील सर्व कृषी ग्राहकांसाठी अशा फिडरवर आधारीत मीटरींग/बिलिंग योजनेचा विस्तार करण्यासाठी सर्व फिडर्ससाठी एएमआर/एमआरआय डेटाच्या नियमित उपलब्धतेसाठी तपशीलवार अभ्यास असणे आवश्यक आहे आणि म्हणून आयोगाने महावितरणला असा अभ्यास हाती घेण्यासाठी कृती आराखडा आणि कालबध्द कार्यक्रम सादर करण्याचे निर्देश दिले होते.

२६. त्याशिवाय, आयोगाने असेही नमूद केले आहे की, निवडक ५०२ कृषी फिडर्सच्या वितरण रोहित्रांसाठी एएमआर सुविधांसह मीटर प्रदान करण्यासाठीची योजना आणि निविदा प्रक्रिया सुरु आहे.

२७. आयोगाने अचूक समायोजनाच्या कालावधीसाठी आणि मध्यावधी आढावा प्रक्रियेंतर्गत अंदाजांच्या प्रयोजनासाठी कृषी वापरासाठीच्या वीज विक्रीच्या निश्चितीकरणासाठी बहु-वर्षीय वीज दर आदेशांतर्गत निश्चित केल्याप्रमाणे फिडरवर आधारित कृषी इण्डेक्स चालू ठेवला आहे. अशा मूल्यांकनाच्या आधारावर, अचूक समायोजन कालावधीसाठी वितरण हानिची पातळी खाली दिल्याप्रमाणे राहील:

| तपशील | आर्थिक वर्ष २०१९-२० | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ |
|---|---|---|---|
| बहु-वर्षीय वीज दर आदेश (लक्ष्यांक) | १८.२६% | १८.०१% | १६.००% |

| | | | |
|---|---|---|---|
| **मध्यावधी आढावा याचिका** | १७.०९% | १६.९१% | १६.५७% |
| **सदर मध्यावधी आढाव्यामध्ये मान्यता दिलेली** | २१.२६% | २२.७२% | २३.५४% |

**इ. कृषी वीज वापराच्या देयक आकारणीसाठी अन्य पुढाकार आणि महाराष्ट्र शासनास सल्ला**

२८. आयोगाने फिडर स्तरावरील एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक हानिशी (AT&C loss) निगडीत लघु-दाब कृषी ग्राहकांसाठी फिडर-निहाय प्रोत्साहन-अधिदान देणे/प्रोत्साहन-अधिदान काढून घेण्याची पध्दती सुरु केली आहे, ज्यामध्ये थ्रेशोल्ड मर्यादेपेक्षा कमी AT&C loss असलेले फिडरशी जोडलेले कृषी ग्राहक मान्यता दिलेल्या वीज दरातून सवलत मिळण्यास पात्र असतील. अशी फिडरवर आधारित AT&C हानिशी जोडलेली वीज दर यंत्रणा आर्थिक वर्ष २०२३-२४च्या पहिल्या तिमाहीपासून लागू केली जाऊ शकते. महावितरण कंपनीला आदेश जारी केल्यापासून तीन महिन्याच्या आत, कृषी ग्राहकांसाठी अशा भिन्न वीज दराच्या अंमलबजावणीसाठी कार्यात्मक पध्दतीसह त्यांच्या AT&C हानिच्या पातळीसह कृषी फिडर्सची यादी २०२२-२३ या आर्थिक वर्षात सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत आणि सदर आदेश निर्गमित झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत ही व्यवस्था अंमलात आणण्यासाठी त्यांच्या संकेत-स्थळावर ते प्रसिध्द करण्यासह त्यास व्यापक प्रसिध्दी देण्याचे देखील निर्देश देण्यात आले आहेत.

२९. त्याशिवाय, आयोगाने असे मत मांडले आहे की, कृषी वीज दराची रचना संलग्न विद्युत भार आणि कृषी पंपाची क्षमतेच्या व्यतिरिक्त पीक पध्दती, पिकाचा प्रकार, कृषी क्षेत्राची व्याप्ती, भौगोलिक विविधता ह्या घटकांशी जोडण्याबाबत पुनरावलोकन करणे आवश्यक आहे. पुढील नियंत्रण कालावधीसाठी वीज दर सुधारणेदरम्यान, महावितरण कंपनी या निकषांच्या आधरावर कृषी ग्राहकांसाठी वीज दर प्रस्तावित करील, जेणेकरुन जन सुनावणी प्रक्रियेनंतर त्यावर अंतिम निर्णय घेता येईल. महावितरण कंपनीने यावर सविस्तर अभ्यास करावा आणि त्याच्या सर्व फायदे व तोट्यांसह तपशीलवार प्रस्ताव सादर करावा.

३०. आयोगाने महाराष्ट्र शासनाला कृषी ग्राहकांसाठी नवीन कंपनी स्थापन करण्याची सूचना केली आहे, जेणेकरुन ग्राहकांच्या वेगवेगळ्या वर्गवारींमध्ये क्रॉस-सबसिडी कायम ठेवता येईल. तसेच, कृषी ग्राहक/फिडर्सना पुरविण्यात येणाऱ्या वीज वापराचा हिशोब आणि पुरवठ्याच्या गुणवत्तेसाठी

समर्पित आणि केंद्रीभूत प्रयत्नांची आवश्यकता आहे. स्वतंत्र कृषी कंपनीच्या स्थापनेमुळे या दोन्ही वर्गवारीतील ग्राहकांसाठी दोन स्वतंत्र संस्थांकडे त्यांचे संनियंत्रण आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करणे शक्य होईल. वरील बाबी लक्षात घेता, आयोगाने महावितरण कंपनीला या पर्यायाचा पाठपुरावा करण्याचे आणि त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याची पध्दती तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.

**एफ. नवीन पुढाकार :**

३१. आयोगाने ग्रामपंचायत/स्थानिक संस्था किंवा महिला स्वयं-सहायता गटाद्वारे चालविण्यात येणारे 'वॉटर एटीएम' (आरओ/युव्ही/युएफ) जल शुध्दीकरण प्रकल्पांचा समावेश लघु-दाब सार्वजनिक जल कामे वर्गवारी अंतर्गत केला आहे, ज्यामुळे अशा 'वॉटर एटीएम'ला कमी वीज दराचा लाभ घेता येईल.

३२. आयोगाने लघु-दाब कृषी, लघु-दाब पीडब्ल्युडब्ल्यु आणि लघु-दाब पथदिवे मधील ग्राहकांना देण्यात येणारी १ टक्क्यांची सवलत चालू ठेवली आहे, जेणेकरुन देय दिनांकाच्या आत सातत्याने देयकाचा भरणा करुन या तिन्ही वर्गवारींच्या वसुली कार्यक्षमतेमध्ये सुधारणा होईल. जे ग्राहक नियमित भरणा करतात त्यांची नोंद ठेवल्यावरच अशा ग्राहकांना द्यावयाच्या सवलतीचे परीक्षण केले जाईल आणि त्रैमासिक आधारावर ही सवलत देण्यात येईल.

**जी. अन्य प्रश्न :**

३३. वितरण जाळ्यात वाढ करण्यासह, एचव्हीडीएस योजना, पायाभूत सोयीसुविधेशी संबंधित कामे, उप-केंद्रे स्वयंचलन आणि स्मार्ट मीटर बसविणे इ. वितरण परवानाधारकांनी प्रस्तावित केलेल्या नवीन उपक्रमांपोटी मंजूर केलेल्या भांडवलीकरणाचा परिणाम देखील आयोगाने विचारात घेतला आहे.

३४. आयोगाने, परवानाधारकाची विनंती विचारात घेऊन, नवीन अर्जावर कार्यवाही करणे, सेवा जोडणी आकार, मीटर बदलण्याची विनंती इ. करिता लागू असलेली आकारांच्या अनुसूचीमधील बदलास देखील मंजुरी दिली आहे.

३५. आयोगाने महावितरण कंपनीला सदर आदेश निर्गमित केल्यापासून तीन महिन्यांच्या आत, पुरवठा संहिता विनियम, २०२१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कामगिरीच्या मानकांचे पालन करण्यात झालेल्या

त्रुटीसाठी स्वयंचलित भरपाई यंत्रणेची अंमलबजावणी करण्याचे आणि त्यांच्या संकेत-स्थळावर स्वयंचलित भरपाई यंत्रणेसाठी व्यापक प्रसिध्दी देण्याचे निर्देश दिले आहेत.

३६. आर्थिक वर्ष २०२३-२४ ते २०२४-२५ साठी विद्यमान आणि सुधारित वर्गवारी-निहाय वीज दराची तुलना खालील परिशिष्टांमध्ये देण्यात आली आहेः

- **परिशिष्ट १:** आर्थिक वर्ष २०२३-२४ करिता सुधारित वर्गवारी-निहाय वीज दर;
- **परिशिष्ट २:** आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता सुधारित वर्गवारी-निहाय वीज दर;
- **परिशिष्ट ३:** वर्गवारी-निहाय  सरासरी देयक आकारणी दर आणि वीज दरातील सुधारणा;
- **परिशिष्ट ४:** वर्गवारी-निहाय क्रॉस-सबसिडी पातळीची स्थिती;
- **परिशिष्ट ५:** महावितरण कंपनीने दावा केलेली एकूण महसुली गरज आणि आयोगाकडून मंजूर करण्यात आलेली रक्कम या दोहोंतील ठळक तफावत

३७. सदर आदेश आयोगाच्या www.merc.gov.in. या संकेत-स्थळावर पाहता आणि उतरवून घेता येईल.

## Annexure 1 Revised category-wise Tariffs for FY 2023-24

**Summary of LT Tariff for FY 2023-24, effective from 1 April, 2023**

| Category | Units | FY 2023-24 | | |
|---|---|---|---|---|
| | | Fixed/ Demand Charge | Energy Charge | Wheeling Charge |
| **LT Residential** | | | | |
| **LT I(A): LT - Residential-BPL** | Rs/conn/mth | 31.00 | 1.51 | 0 |
| LT I(B): LT - Residential | | | | |
| 1-100 units | Rs/conn/mth | 116.00 | 4.41 | 1.17 |
| 101-300 units | Rs/conn/mth | 116.00 | 9.64 | 1.17 |
| 301-500 units | Rs/conn/mth | 116.00 | 13.61 | 1.17 |
| Above 500 units | Rs/conn/mth | 116.00 | 15.57 | 1.17 |
| Three Phase Charges | Rs/conn/mth | 385.00 | - | - |
| **LT II: LT - Non-Residential** | | | | |
| (A) 0 – 20 kW | Rs/conn/mth | 470.00 | 8.27 | 1.17 |
| (B): >20 kW and ≤ 50 kW | Rs/kVA/mth | 470.00 | 12.63 | 1.17 |
| (C): >50 kW | Rs/kVA/mth | 470.00 | 14.93 | 1.17 |
| **LT III: LT - Public Water Works (PWW)** | | | | |
| (A): 0-20 kW | Rs/kVA/mth | 117.00 | 3.54 | 1.17 |
| (B): >20 kW and ≤ 40 kW | Rs/kVA/mth | 142.00 | 5.49 | 1.17 |
| (C): >40 kW | Rs/kVA/mth | 176.00 | 7.28 | 1.17 |
| **LT IV: LT - Agriculture** | | | | |
| **LT IV(A): LT - AG Un-metered - Pumpsets** | | | | |
| *Category 1 Zones* | | | | |
| (a) 0-5 HP | Rs/HP/mth | 467.00 | - | 117.00 |
| (b) Above 5 HP - 7.5 HP | Rs/HP/mth | 504.00 | - | 117.00 |
| (c) Above 7.5 HP | Rs/HP/mth | 566.00 | - | 117.00 |
| *Category 2 Zones* | | - | - | - |
| (a) 0-5 HP | Rs/HP/mth | 361.00 | - | 117.00 |
| (b) Above 5 HP - 7.5 HP | Rs/HP/mth | 395.00 | - | 117.00 |
| (c) Above 7.5 HP | Rs/HP/mth | 457.00 | - | 117.00 |
| **LT IV(B): LT - Agriculture Metered Tariff - Pumpsets** | Rs/HP/mth | 47.00 | 3.00 | 1.17 |
| **LT IV(C): LT - Agriculture Metered – Others** | Rs/HP/mth | 129.00 | 5.06 | 1.17 |
| **LT V: LT - Industry *** | | | | |
| (i): 0-20 kW | Rs/conn/mth | 530.00 | 5.98 | 1.17 |
| (ii): Above 20 kW | Rs/kVA/mth | 353.00 | 7.08 | 1.17 |
| **LT VI: LT - Street Light** | | | | |
| (A): Grampanchayat; A B & C Class Municipal Council | Rs/kW/mth | 129.00 | 6.63 | 1.17 |
| (B): Municipal corporation Area | Rs/kW/mth | 129.00 | 8.07 | 1.17 |
| **LT VII (A) - Public Services – Govt.** | | | | |
| (i): ≤ 20 kW | Rs/conn/mth | 388.00 | 4.13 | 1.17 |
| (ii): >20 - ≤ 50 kW | Rs/kVA/mth | 388.00 | 5.94 | 1.17 |
| iii): >50 kW | Rs/kVA/mth | 388.00 | 7.45 | 1.17 |
| **LT VII (B) - Public Services - Others** | | | | |
| (i): ≤ 20 kW | Rs/conn/mth | 422.00 | 5.94 | 1.17 |
| (ii): >20 - ≤ 50 kW | Rs/kVA/mth | 422.00 | 9.52 | 1.17 |
| iii): >50 kW | Rs/kVA/mth | 422.00 | 9.40 | 1.17 |
| **LT VIII – Electric Vehicle Charging Station** | Rs/kVA/mth | 75.00 | 6.08 | 1.17 |

***Note**: *Lower tariff (discount/rebate) of (2.5_%) shall be available in Energy Charge Component (including FAC, if applicable)of Tariff for both slabs (<20 kW and > 20 kW) for LT – Industry (Powerloom) as against approved Energy Charge Component of Tariff applicable for respective slabs under LT-Industry.*

| Summary of HT Tariff for FY 2023-24, effective from 1 April, 2023 | | | | |
|---|---|---|---|---|
| **Category** | **Units** | **FY 2023-24** | | |
| | | **Fixed/ Demand Charge** | **Energy Charge** | **Wheeling Charge** |
| EHV | | | | |
| HT I (A) HT - Industry | Rs/kVA/mth | 499.00 | 8.12 | - |
| HT I (B): HT - Industry (Seasonal) | Rs/kVA/mth | 499.00 | 8.43 | - |
| HT II: HT – Commercial | Rs/kVA/mth | 499.00 | 12.83 | - |
| HT III : HT - Railways/Metro/Monorail Traction | Rs/kVA/mth | 499.00 | 7.53 | - |
| HT IV: HT - Public Water Works | Rs/kVA/mth | 499.00 | 7.53 | - |
| HT V(A): HT - Agriculture Pumpsets | Rs/kVA/mth | 88.00 | 5.26 | - |
| HT V(B): HT - Agriculture - Others | Rs/kVA/mth | 88.00 | 7.27 | - |
| HT VI: HT - Group Housing Societies (Residential) | Rs/kVA/mth | 398.00 | 6.95 | - |
| HT VIII(A): HT - Public Services-Gov. | Rs/kVA/mth | 499.00 | 9.53 | - |
| HT VIII(B): HT - Public Services-Others | Rs/kVA/mth | 499.00 | 10.40 | - |
| HT IX: HT – Electric Vehicle Charging Station | Rs/kVA/mth | 75.00 | 7.05 | - |
| HT | | | | |
| HT I (A) HT - Industry Sub-total | Rs/kVA/mth | 499.00 | 8.12 | 0.60 |
| HT I (B): HT - Industry (Seasonal) | Rs/kVA/mth | 499.00 | 8.43 | 0.60 |
| HT II: HT – Commercial | Rs/kVA/mth | 499.00 | 12.83 | 0.60 |
| HT III : HT - Railways/Metro/Monorail Traction | Rs/kVA/mth | 499.00 | 7.53 | 0.60 |
| HT IV: HT - Public Water Works | Rs/kVA/mth | 499.00 | 7.53 | 0.60 |
| HT V(A): HT - Agriculture Pumpsets | Rs/kVA/mth | 88.00 | 5.26 | 0.60 |
| HT V(B): HT - Agriculture - Others | Rs/kVA/mth | 88.00 | 7.27 | 0.60 |
| HT VI: HT - Group Housing Societies (Residential) | Rs/kVA/mth | 398.00 | 6.95 | 0.60 |
| HT VIII(A): HT - Public Services-Gov. | Rs/kVA/mth | 499.00 | 9.53 | 0.60 |
| HT VIII(B): HT - Public Services-Others | Rs/kVA/mth | 499.00 | 10.40 | 0.60 |
| HT IX: HT – Electric Vehicle Charging Station | Rs/kVA/mth | 75.00 | 6.90 | 0.60 |

**Note:**

(i) EC, WC and VC for FY 2023-24 is expressed in Rs/kVAh (for HT category) and in Rs/kWh (for LT category)

## Annexure 2: Revised category-wise Tariffs for FY 2024-25

**Summary of LT Tariff for FY 2024-25, effective from 1 April, 2024**

| Category | Units | FY 2024-25 | | |
|---|---|---|---|---|
| | | Fixed/ Demand Charge | Energy Charge | Wheeling Charge |
| **LT Residential** | | | | |
| **LT I(A): LT - Residential-BPL** | Rs/conn/mth | 34.00 | 1.56 | 0 |
| LT I(B): LT - Residential | | | | |
| 1-100 units | Rs/conn/mth | 128.00 | 4.71 | 1.17 |
| 101-300 units | Rs/conn/mth | 128.00 | 10.29 | 1.17 |
| 301-500 units | Rs/conn/mth | 128.00 | 14.55 | 1.17 |
| Above 500 units | Rs/conn/mth | 128.00 | 16.64 | 1.17 |
| Three Phase Charges | Rs/conn/mth | 424.00 | - | - |
| **LT II: LT - Non-Residential** | | | | |
| (A) 0 – 20 kW | Rs/conn/mth | 517.00 | 8.52 | 1.17 |
| (B): >20 kW and ≤ 50 kW | Rs/kVA/mth | 517.00 | 13.01 | 1.17 |
| (C): >50 kW | Rs/kVA/mth | 517.00 | 15.38 | 1.17 |
| **LT III: LT - Public Water Works (PWW)** | | | | |
| (A): 0-20 kW | Rs/kVA/mth | 129.00 | 4.09 | 1.17 |
| (B): >20 kW and ≤ 40 kW | Rs/kVA/mth | 156.00 | 6.33 | 1.17 |
| (C): >40 kW | Rs/kVA/mth | 194.00 | 8.40 | 1.17 |
| **LT IV: LT - Agriculture** | | | | |
| **LT IV(A): LT - AG Un-metered - Pumpsets** | | | | |
| *Category 1 Zones* | | | | |
| (a) 0-5 HP | Rs/HP/mth | 563.00 | - | 117.00 |
| (b) Above 5 HP - 7.5 HP | Rs/HP/mth | 607.00 | - | 117.00 |
| (c) Above 7.5 HP | Rs/HP/mth | 683.00 | - | 117.00 |
| *Category 2 Zones* | | - | - | - |
| (a) 0-5 HP | Rs/HP/mth | 435.00 | - | 117.00 |
| (b) Above 5 HP - 7.5 HP | Rs/HP/mth | 476.00 | - | 117.00 |
| (c) Above 7.5 HP | Rs/HP/mth | 551.00 | - | 117.00 |
| **LT IV(B): LT - Agriculture Metered Tariff - Pumpsets** | Rs/HP/mth | 52.00 | 3.39 | 1.17 |
| **LT IV(C): LT - Agriculture Metered – Others** | Rs/HP/mth | 142.00 | 5.71 | 1.17 |
| **LT V: LT - Industry *** | | | | |
| (i): 0-20 kW | Rs/conn/mth | 583.00 | 6.16 | 1.17 |
| (ii): Above 20 kW | Rs/kVA/mth | 388.00 | 7.30 | 1.17 |
| **LT VI: LT - Street Light** | | | | |
| (A): Grampanchayat; A B & C Class Municipal Council | Rs/kW/mth | 142.00 | 6.83 | 1.17 |
| (B): Municipal corporation Area | Rs/kW/mth | 142.00 | 8.31 | 1.17 |
| **LT VII (A) - Public Services – Govt.** | | | | |
| (i): ≤ 20 kW | Rs/conn/mth | 427.00 | 4.29 | 1.17 |
| (ii): >20 - ≤ 50 kW | Rs/kVA/mth | 427.00 | 6.18 | 1.17 |
| iii): >50 kW | Rs/kVA/mth | 427.00 | 7.75 | 1.17 |
| **LT VII (B) - Public Services - Others** | | | | |
| (i): ≤ 20 kW | Rs/conn/mth | 464.00 | 6.18 | 1.17 |
| (ii): >20 - ≤ 50 kW | Rs/kVA/mth | 464.00 | 9.91 | 1.17 |
| iii): >50 kW | Rs/kVA/mth | 464.00 | 9.78 | 1.17 |
| **LT VIII – Electric Vehicle Charging Station** | Rs/kVA/mth | 80.00 | 6.58 | 1.17 |

***Note**: *Lower tariff (discount/rebate) of (2.5_%) shall be available in Energy Charge Component (including FAC, if applicable)of Tariff for both slabs (<20 kW and > 20 kW) for LT – Industry (Powerloom) as against approved Energy Charge Component of Tariff applicable for respective slabs under LT-Industry.*

| Summary of HT Tariff for FY 2024-25, effective from 1 April, 2024 | | | | |
|---|---|---|---|---|
| Category | Units | FY 2024-25 | | |
| | | Fixed/ Demand Charge | Energy Charge | Wheeling Charge |
| EHV | | | | |
| HT I (A) HT - Industry | Rs/kVA/mth | 549.00 | 8.36 | - |
| HT I (B): HT - Industry (Seasonal) | Rs/kVA/mth | 549.00 | 8.68 | - |
| HT II: HT – Commercial | Rs/kVA/mth | 549.00 | 13.21 | - |
| HT III : HT - Railways/Metro/Monorail Traction | Rs/kVA/mth | 549.00 | 7.53 | - |
| HT IV: HT - Public Water Works | Rs/kVA/mth | 549.00 | 7.76 | - |
| HT V(A): HT - Agriculture Pumpsets | Rs/kVA/mth | 97.00 | 5.78 | - |
| HT V(B): HT - Agriculture - Others | Rs/kVA/mth | 97.00 | 7.99 | - |
| HT VI: HT - Group Housing Societies (Residential) | Rs/kVA/mth | 438.00 | 7.16 | - |
| HT VIII(A): HT - Public Services-Gov. | Rs/kVA/mth | 549.00 | 10.03 | - |
| HT VIII(B): HT - Public Services-Others | Rs/kVA/mth | 549.00 | 10.93 | - |
| HT IX: HT – Electric Vehicle Charging Station | Rs/kVA/mth | 80.00 | 7.60 | - |
| HT | | | | |
| HT I (A) HT - Industry Sub-total | Rs/kVA/mth | 549.00 | 8.36 | 0.60 |
| HT I (B): HT - Industry (Seasonal) | Rs/kVA/mth | 549.00 | 8.68 | 0.60 |
| HT II: HT – Commercial | Rs/kVA/mth | 549.00 | 13.21 | 0.60 |
| HT III : HT - Railways/Metro/Monorail Traction | Rs/kVA/mth | 549.00 | 7.53 | 0.60 |
| HT IV: HT - Public Water Works | Rs/kVA/mth | 549.00 | 7.76 | 0.60 |
| HT V(A): HT - Agriculture Pumpsets | Rs/kVA/mth | 97.00 | 5.78 | 0.60 |
| HT V(B): HT - Agriculture - Others | Rs/kVA/mth | 97.00 | 7.99 | 0.60 |
| HT VI: HT - Group Housing Societies (Residential) | Rs/kVA/mth | 438.00 | 7.16 | 0.60 |
| HT VIII(A): HT - Public Services-Gov. | Rs/kVA/mth | 549.00 | 10.03 | 0.60 |
| HT VIII(B): HT - Public Services-Others | Rs/kVA/mth | 549.00 | 10.93 | 0.60 |
| HT IX: HT – Electric Vehicle Charging Station | Rs/kVA/mth | 80.00 | 7.40 | 0.60 |

**Note:**

(i) EC, WC and VC for FY 2024-25 is expressed in Rs/kVAh (for HT category) and in Rs/kWh (for LT category)

## Annexure 3: Category-wise Average Billing Rate and Tariff Increase/(Reduction) for MSEDCL's consumers for FY 2023-24 and FY 2024-25

| Category | Average Billing Rate (Rs/kWh) | | | % increas in Tariff | |
|---|---|---|---|---|---|
| | Existing Tariff for FY 2022-23 (incl. FAC) | Approved Tariff (For FY2023-24 | Approved Tariff (For FY2024-25) | y-o-y over FY2022-23 | y-o-y over FY2023-24 |
| HT I (A): HT - Industry | 9.62 | 9.69 | 10.09 | 1% | 4% |
| HT II: HT - Commercial | 15.05 | 15.03 | 15.58 | 0% | 4% |
| HT III: HT - Railways/Metro/Monorail Traction | 9.60 | 9.65 | 10.11 | 1% | 5% |
| HT IV: HT - Public Water Works (PWW) | 8.67 | 8.91 | 9.25 | 3% | 4% |
| HT V: HT - Agriculture Pumps | 5.94 | 6.50 | 7.12 | 9% | 9% |
| HT VI: HT - Group Housing Societies (Residential) | 8.31 | 8.64 | 8.96 | 4% | 4% |
| HT VIII : HT - Public Services | 11.72 | 12.08 | 12.74 | 3% | 5% |
| **HT Total** | **9.69** | **9.78** | **10.18** | **1%** | **4%** |
| LT I: LT - Residential | 8.39 | 8.90 | 9.47 | 6% | 6% |
| LT II: LT - Non-Residential | 13.18 | 13.03 | 13.51 | -1% | 4% |
| LT III: LT - Public Water Works (PWW) | 5.34 | 5.85 | 6.56 | 10% | 12% |
| LT IV: LT - Agriculture Metered | 4.25 | 4.65 | 5.08 | 9% | 9% |
| LT V : LT - Industry | 9.38 | 9.25 | 9.64 | -1% | 4% |
| LT VI: LT - Street Light | 9.07 | 9.28 | 9.66 | 2% | 4% |
| LT VII - Public Services | 9.51 | 10.10 | 10.61 | 6% | 5% |
| **LT Total** | **7.41** | **7.79** | **8.34** | **5%** | **7%** |

**Notes:**

(i) ABR Existing Tariff and Approved Tariff is expressed in Rs/kVAh (for HT category) and in Rs/kWh (for LT category), as applicable for 4th Control Period

(ii) Comparison of ABR figures is presented at category level for general purpose, actual impact may vary depending on slabs/consumption

(iii) ABR for LT-AG represent ABR for metered AG consumersCategory

## Annexure 4: Category-wise Cross-Subsidy for MSEDCL's consumers for FY 2023-24 and FY 2024-25

| Category | Existing (FY2022-23) | Approved (FY2023-24) | Approved (FY2024-25) |
|---|---|---|---|
| HT I (A): HT - Industry | 115% | 115% | 113% |
| HT II: HT - Commercial | 178% | 178% | 174% |
| HT III: HT - Railways/Metro/Monorail Traction | 115% | 114% | 113% |
| HT IV: HT - Public Water Works (PWW) | 103% | 105% | 104% |
| HT V: HT - Agriculture Pumps | 60% | 77% | 80% |
| HT VI: HT - Group Housing Societies (Residential) | 97% | 102% | 100% |
| HT VIII(B) : HT - Public Services | 146% | 143% | 143% |
| **HT Total** | **115%** | **116%** | **114%** |
| LT I: LT - Residential | 102% | 105% | 106% |
| LT II: LT - Non-Residential | 154% | 154% | 151% |
| LT III: LT - Public Water Works (PWW) | 61% | 69% | 73% |
| LT IV: LT - Agriculture Metered | 51% | 55% | 57% |
| LT V: LT - Industry | 117% | 109% | 108% |
| LT VI: LT - Street Light | 95% | 110% | 108% |
| LT VII(B)- Public Services | 114% | 119% | 119% |
| **LT Total** | **90%** | **92%** | **93%** |

## Annexure 5: Key variations between the ARR claimed by MSEDCL and amounts approved by the Commission

| ARR components and Revenue Gap | ARR Claimed over the 6-year period from FY 2019-20 to FY 2024-25 (Rs. Crore) | | |
|---|---|---|---|
| | **MSEDCL** | **Commission** | **Difference** |
| Power Purchase Expenses | 4,13,812 | 4,02,990 | -10,821 |
| Operation & Maintenance Expenses | 48,134 | 47,433 | -701 |
| Capex related expense (Depn, Int, RoE) | 35,753 | 33,537 | -2,216 |
| Opex Scheme | 3,272 | 334 | -2,939 |
| Interest on Working Capital | 3,125 | 732 | -2,393 |
| Inter-state Transmission Charges (TTSC share) | 34,526 | 39,520 | 4,994 |
| Sharing of Gains/Loss - Dist. Loss (excess PP) | 173 | -5,523 | -5,696 |
| Sharing of Gains/Loss - O&M and IoWC | 1,304 | 685 | -619 |
| Other Items | 39,556 | 36,111 | -3,445 |
| **Aggregate Revenue Requirement** | **5,79,656** | **5,55,820** | **-23,836** |
| Revenue from Sale of Power | 5,14,214 | 5,15,582 | 1,368 |
| Non-Tariff & other income | 6,780 | 6,780 | - |
| **Total Revenue** | **5,20,994** | **5,22,362** | **1,368** |
| **Revenue Gap/(Surplus)** | **58,661** | **33,458** | **-25,204** |
| Impact of past reovery Review Order | 247 | 247 | - |
| Impact of true-up of MSPGCL | - | 1,090 | 1,090 |
| Carrying Cost | 8,734 | 4,772 | -3,962 |
| **Net Impact on Revenue Gap/(Surplus)** | **67,643** | **39,567** | **-28,076** |